# महाराष्ट्र शासन

**सहसंचालक, उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर**
**देवगिरी महाविद्यालयाजवळ, रेल्वेस्टेशन रोड,(नविन इमारत) छत्रपती संभाजीनगर.**
दुरध्वनी क्रं. 0240-2331913 फॅक्स क्रं. 0240-2331913
Web: www.jdheaurangabad.in Mail.ID : **jdheaurpayunit@2021gmail.com**

जा.क्र.शिससं/उशि/सीएचबी/छ.सं/वेतन पथक/2025-26/ 2537 दिनांक 16.07.2025.

**प्रति**
**सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान,**
**व विधी व शिक्षणशास्त्र, आणि शा. शिक्षणशास्त्र महाविद्यालये,**
**छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर,**

**विषय - अशासकीय अनुदानीत महाविद्यालयात घडयाळी तासिका तत्वावरील नियुक्त अध्यापकांच्या सन २०२५-२६ शैक्षणिक वर्षामधील मानधनाची देयके दरमहा सादर करणे बाबत..**

संदर्भ - १. शासन निर्णय क्रं.संकीर्ण-२००८(१८३)/०८/ताशि-५, दि. ०५.११.२००८
२. शासन निर्णय क्रं.संकीर्ण-२०१८(१८५/१८) मशि-३, दि. १४.११.२०१८
३. मा.शिक्षण संचालक उ.शि.पुणे यांचे पत्र क्रमांक अर्थसं-२१-२२ अशा.अनु.महावि/अकृवि/लेखा- २/७७४० दि.०२.०७.२०२१
४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक अर्थसं-२०२२/प्र.क्र.१०५/(१)/मशि-३. दि. २७.०३.२०२३

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, या विभागातील सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्त्या सर्व प्रक्रिया करुन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ आरंभ होण्यापूर्वी करण्याबाबत सर्व महाविद्यालयांना परिपत्रक दिनांक २७.०४.२०२५ अन्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदर परिपत्रकाची प्रत यासोबत जोडण्यात येत आहे. त्यानुसार विभागातील महाविद्यालयांना नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित करुन सर्व महाविद्यालयांनी विहीत प्रक्रिया करुन तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्त्या महाविद्यालयात केलेल्या आहेत. तासिका तत्वावरील अध्यापकांना दरमहा मानधन अदायगी करण्याबाबत शासनाने अनेक वेळा सुचना दिलेल्या असून सदर सुचना वेळोवेळी महाविद्यालयांना कळविण्यात आलेल्या आहेत, परंतू काही महाविद्यालये तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधनाची देयके प्रस्तुत कार्यालयास नियमितपणे दरमहा सादर करीत नसल्याची बाब यापूर्वीच्या कालावधीत निदर्शनास आलेली आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये तासिका तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या अध्यापकांना दरमहा मानधन अदायगी करणेची जबाबदारी प्राचार्य म्हणून आपल्यावर व्यक्तीशः आहे याची जाणिव असावी. प्रस्तुत कार्यालयाकडून आपल्या मागणीनुसार दरमहा तासिका तत्वावरील अध्यापकांच्या मानधनाची रक्कम नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वेतनाबरोबर दरमहा अदा करण्याची कार्यवाही करण्यात येते हे आपणास अवगत आहेच. त्यामुळे विभागांतर्गत तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या अध्यापकांना **तासिका तत्वावरील मानधन नियमितपणे वेळेवर दरमहा प्राप्त होण्यासाठी देयके दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत प्रस्तुत कार्यालयास सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी**, महाविद्यालयाकडून याप्रमाणे कार्यवाही न झाल्यामुळे तासिका तत्वावरील अध्यापक्रांना मानधन अदायगीस विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी प्राचार्य आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राचार्य या नात्याने आपल्यावर व्यक्तीशः राहील, याची नोंद घ्यावी.

**(डॉ. रणजितसिंह कृ. निंबाळकर )**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
छ. संभाजीनगर विभाग, छ. संभाजीनगर.

**प्रत,** 1. मा.शिक्षण संचालक उच्च शिक्षण शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव.
2. मा.कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यीपीठ औरंगाबाद यांना माहितीस्तव.